जिल्हा परिषद अमरावती

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

दूरध्वनी क्रमांक ०७२१ २६६२९२६

ई-मेल – ceozp.amravati@maharashtra.gov.in

जा.क्र – जिप/मुकाअ/स्वी.स./४३३५ | दिनांक- ६ एप्रिल २०२६

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे
नागरिकांकडून प्राप्त निवेदने/तक्रारींचे
यांच्या निपटारा कालबध्द विहित
कालमर्यादित करणेबाबत...

## <u>परिपत्रक</u>

अमरावती जिल्हयातील तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावरुन नागरिक/अभ्यागत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत संबंधित गा-हाणी, निवेदने आणि तक्रारी घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे येत असतात. तसेच काही तक्रारी मध्यवर्ती टपाल शाखेत स्विकारल्या जातात. नागरिकांकडून प्राप्त तक्रारींचे विहित कालमर्यादित अंतिम कार्यवाहीकरुन संबंधित तक्रारकर्त्यास लेखी अवगत करणे क्रमप्राप्त आहे. परंतु असे निदर्शनास येत आहे की, निवेदने प्राप्त झाल्यानंतर विभागाकडून अधिनस्त संबंधित शाखा किंवा कार्यालयाकडे पाठविली जातात. अंतिम कार्यवाही होत नाही किंवा विलंबाने दखल घेतली जाते. त्यासाठी खालील प्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

१. सामान्य प्रशासन विभागाच्या मध्यवर्ती आवक शाखेत प्राप्त होणारा पत्रव्यवहाराची (शासकीय आणि नागरिकांच्या तक्रारी संदर्भातील) टपाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर सर्व प्रथम ऑफलाईन सादर करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्रायानंतर सदरचा पत्रव्यवहार ई-ऑफीस रिसीप्ट टॅबवर अपलोड करावा.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून जी निवेदन "Z" आणि "GRC" असे वर्गीकृत करण्यात येतील त्या प्रकरणांवर जास्तीत जास्त ५ दिवसात कार्यवाही करणे बंधनकारक राहील. ५ दिवसात कार्यवाही करणे शक्य नसल्यास तसे संबंधित तक्रारदारास लेखी कळवावे आणि अंतिम कार्यवाहीची मर्यादा लेखी नमुद करावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त होणा-या निवेदनावर ७ दिवसात अंतिम कार्यवाही विभागांनी करावी. ज्यावेळी ७ दिवसात कार्यवाही करणे शक्य होत नसेल, त्याठिकाणी समर्पक कारण नमुद करुन या कार्यालयास तशी माहिती सादर करावी.
४. प्रत्येक आठवडी खातेप्रमुखांच्या प्राधान्याने प्राप्त आणि निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा या कार्यालयाकडून घेण्यात येणार आहे.

(सत्यम गांधी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, जि.प. अमरावती.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती.....सर्व,
३. सर्व तालुका कार्यालयें,...जि.प. अमरावती.
४. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, साप्रवि, जि.प. अमरावती.